# समकालीन गुलामगिरी

## चन्द्रशेखर पुरन्दरे

जगातील सर्व देशांत या ना स्वरूपात गुलामगिरी अस्तित्वात आहे. एकविसाव्या शतकात ही सामाजिक विकृती अस्तित्वात आहेच पण अधिक उग्र होत आहे, ही शरमेची बाब आहे. जगातील १६० देशांचा हा अभ्यास एका संस्थेने [Walk Free] केला आहे. त्याचा गोषवारा लेखात आहे. वर्तमान गुलामगिरी आपल्या दैनंदिन जगण्याशी संलग्न असली तरी ती नजरेआड असते. आपण रोज ज्या वस्तू विकत घेतो किंवा ज्या सेवा वापरतो त्यामागे अनेक लोकांना ती वस्तू बनवायला किंवा ती सेवा द्यायला बळजबरीने भाग पाडलेले असते. ही छुपी किंमत प्रत्येक वेळी आपल्या लक्षात येत नाही.

२०१६ साली कोणत्याही एका दिवशी जगात सुमारे चार कोटी लोक गुलामगिरीत रहात होते, त्यांची संख्या २०२१ला पाच कोटी झाली. म्हणजे दर दिडशे माणसांत एक माणूस गुलाम असतो.

**त्यांचे देशवार चित्र असे -**

भारत - एक कोटी दहा लाख, चीन - ५८ लाख, उत्तर कोरिया - २७ लाख, पाकिस्तान - २३ लाख. बाल-विवाह व सक्तीचा विवाह यांचा या अभ्यासात गुलामगिरीत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे भारत–पाकिस्तान आकडे मोठे आहेत. तर वीघर व इतर मुस्लिमांबाबत चिनी सरकारी धोरण तेथील आकडाही मोठा करते ते पुढे पाहू.

दर हजारी जनसंख्येतील गुलामांचे प्रमाण अशा दुसऱ्या एका क्रमवारीनुसार उत्तर कोरिया - २७ लाख, रशिया - १९ लाख, तुर्कस्तान - १३ लाख, सौदी अरेबिया - साडेसात लाख, अफगाणिस्तान - ५ लाख. इतर उतरत्या क्रमाने. सगळ्यात कमी गुलामगिरी नॉर्डिक देशांत आहे - डेन्मार्क, फिनलंड, नॉर्वे, स्वीडन - प्रत्येकी काही हजारात.

यावरून प्रश्नाची व्याप्ती लक्षात यावी.

सक्तीची मजुरी, सक्तीचे लग्न, कर्ज फेडण्यासाठी वेठबिगारी, लादलेला वेश्याव्यवसाय, आर्थिक फायद्यासाठी केले जाणारे लोकांचे सक्तीचे विस्थापन, लहान मुलांची गुलाम म्हणून विक्री व शोषण इत्यादी अनेक रूपात गुलामगिरी आढळते. मुळात त्या व्यक्तीला ते काम किंवा ते लग्न स्वीकारायचे किंवा नाकारायचे स्वातंत्र्य नसते.

संपूर्ण आढावा एका लेखात शक्य नाही म्हणून केवळ दोन मुद्दे जरा विस्ताराने घेतले आहेत - विवाहसंस्था आणि देशाचे धोरण.

### विवाहसंस्था

बहुतेक समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान असते. पुरुषी वर्चस्वाला त्या त्या धर्माची, परंपरेची मान्यता असते व म्हणून कायदेही पुरुषांना अनुकूल असतात. उदा. वारसाहक्क मुलाला मिळणे, मुलीला नाही, लग्नाचे वय मुलीसाठी किमान १८ नाही, इत्यादि. सामान्यत: या प्रथा गुलामगिरी म्हणून मानल्या गेल्या नाहीत तरी वस्तुत: ती त्या स्त्रीची व्यवस्थात्मक गुलामगिरीच असते.

लग्न करायचे किंवा करायचे नाही, केल्यास कोणाशी, केव्हा करायचे हा निर्णय पूर्णत: त्या व्यक्तीचा असावा. तो मूलभूत मानवी हक्क आहे. २०२१ ला जगात सुमारे सव्वा दोन कोटी लोकांवर लग्न लादले गेले होते. हा अंदाजी आकडा आहे. प्रत्यक्षात तो काही पटीत असावा. संयुक्त राष्ट्रसंघानुसार जगात ६५ कोटी मुली व स्त्रियांचे लग्न १८ पेक्षा कमी वयात झाले. पुरुषांचेही बाल-विवाह होतात पण अगदी तुरळक. जगातील दोन-तृतीयांशापेक्षा अधिक बालविवाह आशिया खंडात होतात. अरब देशांत हे प्रमाण जास्त आहे. तसेच जगभर त्या त्या समाजाच्या परिघावरील लोकांच्यात हे प्रमाण जास्त असते. सक्तीच्या लग्नातील ७३ टक्के लोकांवर आई-वडिलांनी त्या लग्नाची सक्ती केलेली असते तर १६ टक्के लोकांवर नातेवाईकांनी. याखेरीज युद्धजन्य किंवा युद्धाच्या परिस्थितीत मुलींना पळवून 'सैनिकांशी' सक्तीच्या लग्नाचे प्रकार होतात. ते इराक युद्धात झालेले आहेत व सध्याच्या इथिओपिया, सुदान युद्धातही चालू आहेत.

अफगाणिस्तानासारख्या देशांत अतिदारिद्र्यामुळे बालविवाह ही निरुपायी तडजोड होते. 'त्या एका मुलाची भूक दुसरा कोणीतरी भागवेल'.

**देशाने धोरण म्हणून गुलामगिरीत भर टाकणे**

हुकूमशाही सरकार त्याचा कार्यक्रम राबवण्यासाठी सक्तीने लोकांना काम करायला भाग पाडते. गुलामगिरी नष्ट करण्याऐवजी सरकारी धोरणच असे असण्याची जगात उदाहरणे आहेत

ही गुलामगिरी प्रामुख्याने तीन प्रकारची असते.

पहिला व विस्तृत प्रकार म्हणजे कैद्यांचा गुलाम म्हणून वापर. त्यात अहिंसक गुन्ह्यांसाठी, अहिंसक राजकीय विरोधासाठी तुरुंगात टाकलेल्यांचाही वापर - जगभर २२ लाख कैदी. हा प्रकार अनेक देशांत सर्रास चालतो - ब्राझिल, चीन, उत्तर कोरिया, रशिया, पोलंड व इतर - त्यात अमेरिकासुद्धा आहे. चीन व उत्तर कोरियाची विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध नाही. पण आज अमेरिकेत जगातील जास्तीत जास्त लोक तुरुंगात आहेत, म्हणजे वर्तमान किंवा संभाव्य गुलाम. या कैद्यांना आठवड्याची, आजारपणाची सुट्टी नसते, तेव्हाही काम करावे लागते, अन्यथा तो नियमभंग होतो, त्याची निराळी शिक्षा असते.

अमेरिकेत आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे, कृष्णवर्णीय लोकांना अटक होण्याची शक्यता गोऱ्या माणसाला अटक होण्यापेक्षा साडेपाच पट अधिक असते.

चीनच्या मुख्य प्रवाहाच्या हान वंशापासून भिन्न वंश असणारे लोक तेथील वीघर प्रांतात आहेत. त्यांच्या, टर्किक आणि इतर मुस्लिम लोकांच्या रहाण्याच्या मोठ्या प्रदेशांचे प्रचंड तुरुंग-सदृश कॅम्प करण्यात आले आहेत. या लोकांकडून सरकार सक्तीने कामे करवून घेते. कम्युनिस्ट आदर्शवादाचे सक्तीचे प्रशिक्षण, या लोकांच्या पारंपरिक श्रद्धा नाकारणे, कुटुंबांची फारकत, वगैरे छळ अलगच. म्हणजे वर्ण/वंशभेद गुलामगिरीत आधीच्या शतकांसारखीच आजही भर घालतो.

धोरणात्मक गुलामगिरीचा दुसरा प्रकार म्हणजे सक्तीच्या लष्कर भरतीतील उद्याच्या सैनिकांची गुलामगिरी. त्यांना लष्करी नसलेल्या कामांसाठी राबवले जाते. रस्ते बांधणे, धरणे बांधणे, शेतकाम, वगैरे. शेती सरकारी मालकीच्या जमिनीवर असेल किंवा लष्करी अधिकाऱ्यांची खासगी. हा प्रकार इजिप्त, एरित्रिया, माली आणि मंगोलिया देशांत आढळतो. एरित्रियात तर उच्च माध्यमिक शाळांतील शेवटच्या वर्षातील मुला-मुलींना लष्करात सक्तीने भरती केले जाते. शालेय अधिक लष्करी अभ्यास. मुलींचे लैंगिक शोषणही होते. ही भरती टाळणे जवळपास अशक्य असले तरी काहीजण पळून जातात. त्यांना निराळ्या संघटित गुलामगिरीला सामोरे जावे लागते व पकडले गेल्यास सरकारी अत्याचार, प्रसंगी खूनही होतात. म्यानमारमध्ये गेली काही वर्षे लष्करी सत्ता आहे. त्यांचे स्थानिक जनजातींशी युद्ध चालू आहे. तेथे या लहान मुलांकडून खाणकाम, जमिनीतील सुरुंग शोधण्यासारखे जीवघेणे काम करून घेण्यात येते. प्रसंगी, संघर्षात त्यांचा 'ढाल' म्हणून वापर होतो. म्हणजे पहिला हल्ला ही मुले झेलतात.

या गुलामगिरीचा तिसरा प्रकार म्हणजे देशाच्या आर्थिक विकासासाठी नागरिकांचा असा वापर. उत्तर कोरिया या हुकूमशाहीत अशी गुलामगिरी सतत असते. म्यानमारमध्ये चिन व राखिन जनजातींच्या लोकांना सक्तीने लष्करी कामे करावी लागतात. टर्कमेनिस्तान या आधीच्या रशियातून बाहेर पडलेल्या देशात कापसाच्या वार्षिक हंगामात शाळेतल्या मुलांना, शिक्षकांना, इतर कामगारांना कापसाच्या शेतात सक्तीने काम करायला लागते. त्याचा मोबदला नसतो व शिक्षेची तलवार डोक्यावर असते. असेच प्रकार रवांडा, उजबेकिस्तान देशांत आढळतात.

या प्रश्नाला आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. असे श्रमिक बऱ्याचदा आंतरराष्ट्रीय व्यापारात ओढले जातात. उदा. सौर ऊर्जेच्या निर्मितीसाठी polysilicon हा घटक लागतो. जगाच्या मागणीच्या ४५ टक्के polysilicon वीघर प्रांतातून येतो. चीन तिबेटी लोकांची अशीच गुलामगिरी करतो. उदा. चीनहून निर्यात होणारे हातमोजे स्थानिक सक्तीखाली बनवतात. कोविददरम्यान ऑस्ट्रेलियाने आयात केलेले एक संरक्षक उपकरण चीनमधील वीघर प्रांतात बनवले गेले होते. तसेच इंग्लंडनेही उत्तर कोरियाच्या स्त्रियांनी सक्तीने बनवलेले तेच उपकरण घेतले. या व्यापाराबद्दल आयातदारांविरुद्ध खटलेही भरण्यात आले आहेत.

शेवटी, संक्षेपाने गुलामगिरी सुरू होण्याचे आणि वाढण्याचे इतर घटक पाहू. त्यातील एक किंवा अनेक जेथे असतात तेथे गुलामगिरी जास्त होते.

**युद्ध**

देशांतर्गत यादवी किंवा बाहेरच्या देशाशी युद्धामुळे दरवर्षी लाखात लोक विस्थापित होतात. कमालीची हिंसा, अत्याचार याबरोबर युद्ध करणारे सैन्य अनधिकृत असल्यास [आफ्रिकेत अशा बऱ्याच टोळ्या आहेत] लोकांची सक्तीने भरती केली

जाते, सक्तमजुरी होते, लग्नाची सक्ती होते, खंडणीसाठी पळवले जाते, इत्यादि. त्यांच्या मूळ देशाचा किंवा नवीन देशाचा कायदा संरक्षण देत नाही व गुलामगिरी वाढते.

**पर्यावरण**

पर्यावरणाच्या हानीने उपजीविकेची आजवरची संसाधने संपुष्टात येतात, अन्न, पाणी, इतर जीवनावश्यक वस्तूंची टंचाई वाढते, गरीबी येते. पारंपरिक वसतीस्थान सोडायला मजबूर झालेले लोक गुलामगिरीचे सोपे भक्ष्य होतात.

**सोशल मीडिया**

आता सोशल मीडियाचा वापर गुलामगिरी वाढवण्यात होत आहे. आमिषे दाखवणे, खासगी माहिती मिळवणे, ब्लॅकमेलने पैसे उकळणे, इत्यादि. बांगलादेशीय मुलींना सोशल मीडियावर फसवून भारतात वेश्याव्यवसायाला लावण्याचे प्रकार घडलेले आहेत. या मीडियावर नियंत्रण कोणत्याच सरकारला नीट करता येत नाही कारण तंत्रज्ञान अधिक वेगाने वाढते.

**निरीक्षण**

एकूण चित्र पहाता समाजाचा दुबळा थरच गुलामगिरीला बळी पडतो. म्हणजे प्रथम सरकार सक्षम हवे आणि त्याची इच्छाशक्ती प्रामाणिक आणि लोकाभिमुख हवी. [अर्थातच, त्या विस्तारवाढीत इतर धोकेही निर्माण होणार.]

purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk